सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission for Women
// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //
गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in
Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ/२०२५/कत/का-२/ 415
दिनांक : १७.०३.२०२५

# नोटीस

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाचे वित्तीयवर्ष सन २०२५-२६ व २०२६-२७ करीता आयकर भरणा, टिडीएस भरणा, जीएसटी भरणा, व्यवसाय कर भरणा तसेच त्रैमासिक व मासिक तसेच वार्षीक टिडीएस, जीएसटी व आयकर भरणा व कर विषयक बाबीकरीता शासकीय कराविषयी ज्ञान असणारे कर तज्ञ यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सदर नियुक्ती करण्यासाठी दि.२५.०३.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत इच्छुक अनुभवी शासकीय कराविषयी ज्ञान असणारे कर तज्ञ यांचे कडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक दरपत्रक धारकांनी दरपत्रक आपल्या कंपनीच्या लेटरहेड वर सादर करावीत. तसेच दरपत्रकात अतिरक्त कर (GST) चा स्पष्ट उल्लेख करावा. व आपल्या कपनीची इत्यंभूत माहिती दरपत्रकासोबत सादर करावी.

१. उपरोक्त काम प्रत्यक्षात कार्यालयात उपस्थित राहून करणे बंधनकारक राहिल.
२. आयोग कार्यालयातील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहिल.
३. प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या लेखा परिक्षणाच्या वेळी देखील आयोग कार्यालयात संबधित कामकाजासंदर्भात उपस्थित राहणे बंधनकारक राहिल.
४. दरपत्रकात सेवेसाठीचा दर, वस्तू व सेवा करासहित (GST) समाविष्ट करण्यात यावा.
५. पुरवठाराकडे अधिकृत परवाना असणे आवश्यक आहे.
६. आयोगातील सनदी लेखापाल यांच्या सेवा देण्याबाबतचे देयक तीन प्रतीत व त्रैमासिक कार्यालयास सादर करावे तसेच प्रत्येक ३ महिन्यानंतर देण्यात आलेल्या सेवेची खात्री व त्यांची तपासणी झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.
७. सनदी लेखापालाची सेवा समाधानकारक नसल्यास देण्यात येणारी सेवा नाकारण्यात येईल, याची संपूर्णपणे जबाबदारी आपली राहील.
८. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रक रद्द करण्याचा किंवा न स्विकारण्याचा अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई - ५१. यांनी राखून ठेवला आहे.

प्राप्त झालेली दरपत्रके कार्यालयीन कमिटी समोर दि.२५.०३.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात उघडण्यात येतील. यावेळी दरपत्रक धारकांना स्वत: किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत आयोग कार्यालयात प्रत्यक्षात हजर रहावे.

सदर कामकाजाबाबत काही आवश्यक माहिती हवी असल्यास प्रत्यक्षात लेखा शाखेशी संपर्क साधण्यात यावा. सदर बाबतच्या प्राप्त दरपत्रकामधून योग्य त्या संस्थेची नेमणूक किंवा सदर प्रक्रिया पूर्ण करणे याबाबत अंतिम निर्णय मा.सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा राहिल याची नोंद घेण्यात यावी.

लेखा अधिकारी
महाराष्ट्र राज्य महिला आयोग